# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०८/०३/२०१७

आगामी होळी सणाचे उत्सवा दरम्यान दारुचा मोठया प्रमाणात पुरवठा होणार असल्याची दाट शक्यता असल्याने चोरट्या मार्गाने बेकायदेशीर वाहतुक करुन गडचिरोली शहरातील अवैध दारु विक्रेत्यांना दारुचा पुरवठा करणाऱ्या सऱ्हाईत दारु विक्रेत्यांवर आळा घालून त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याचे उद्देशाने मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सा़ो. यांच्या आदेशान्वये त्यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे हे त्यांचे कार्यालयीन पोलीस पथक पोउपनि सुनील इंगळे, पोहवा/बोरकर, दुर्गे, वाळके, नरोटे, चव्हारे, मुंढे, चहारे असे दिनांक ०८/०३/२०१७ रोजी गडचिरोली शहरात प्रोव्हिबिशन गस्तीवर असतांना गस्ती दरम्यान गोपनिय माहितीचे आधारे पोलीस स्टेशन गडचिरोली अंतर्गत मौजा चांदाळा, मारकबोडी, मेंढा, डोंगरगाव, येवली मार्गे मौजा चामार्शी येथे एका महिंद्रा पिकप चारचाकी वाहनाने मोठया प्रमाणात बेकायदेशिर दारुचा पुरवठा होणार असल्याबाबत माहिती मिळताच पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे हे सोबतचे पोलीस पथकासह मौजा डोंगरगाव ते चामोर्शी मुख्य डांबरी रोड दरम्यान सापळा रचुन संशयास्पद वाहनांवर पाळत ठेवून असतांना दिनांक ०८/०३/२०१७ चे रात्री ०२.४५ वाजता सुमारास दारुची बेकायदेशीर वाहतुक करणारे महिंद्रा पिकप वाहनास थांबवून खात्री पटवून घेण्याकरीता वाहनास इशारा केला असता, दारुचा मुद्देमाल साठवणुक करुन ठेवलेले चारचाकी वाहन चालक आपले चारचाकी वाहन भरधाव वेगाने चालवून चामोर्शी कडे पसार झाला. पोलीसांनी पाठलाग केला असता सदरचे चारचाकी वाहन मौजा चामोर्शी येथील ओलल्ला पेट्रोल पंपचे आवारात उभे करुन ठेवल्याचे दिसून आल्याने वाहनाजवळ पोहचून वाहनाची पाहणी केली असता वाहन चालक नामे श्रवन सरजुराम जमकातन रा. कोरची जिल्हा गडचिरोली हा मिळून आल्याने त्याचे ताब्यातील महिंद्रा पिकप चारचाकी वाहन क्र. एम.एच. ३३ जि. २३८१ या वाहनाची झडती घेतली असता नमुद क्रमांकाचे वाहन हे मौजा कोरची येथील दारु पुरवठादार नामे निर्मल धमगाय यांचे असुन चोरटया मार्गाने दारुचा पुरवठा करण्याकरीता पोलीसांची दिशाभुल करण्याचे उद्देशाने वाहनाचे मागील डाल्यात लोखंडी पत्र्यांचा कप्पा तयार करुन त्यात दारुचे बॉक्स लोड करुन बेकायदेशिर वाहतुक करण्याची शक्कल लढविली. परंतु दारु पुरवठा करणाऱ्याची शक्कल उधळून लावून त्याचे

मालकिचे वाहनामधून गोवा स्पेशल व्हिस्की कंपणीच्या छ.ग. राज्य निर्मित प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या एकुण २३५२ सिलबंद निपा किंमत २,८२,२४०/- रूपयाचा प्रोव्हिबिशनचा माल तसेच बेकायदेशिर दारू वाहतुकीकरीता वापरलेले ५,५०,०००/- रूपये किंमतीचे चारचाकी वाहनासह अशाप्रकारे एकुण ८,३२,२४०/- रूपयाचा बेकायदेशिर मुद्देमाल जप्त करून संगणमताने अवैध दारूचा पुरवठा करणारे वाहन चालक आरोपी तसेच दारू पुरवठा करणारे इसमावर पोलीस स्टेशन गडचिरोली येथे दिनांक ०८/०३/२०१७ रोजी अपराध क्र. १११/२०१७ कलम १८८ भा.द.वि.-१८६०, सहकलम ६५(अ)८३, ९८(ग) (२) (१) महा. दारूबंदी अधि. १९४९, सहकलम ३/१८१, १३०/१७७ मोटार वाहन अधिनियम-१९८८ अन्वये आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थागुशा चे पथकाने केलेल्या कार्यवाहीमुळे गडचिरोली जिल्हयातील इतर अवैध विक्री करणाऱ्या तसेच दारूचा पुरवठा करणाऱ्या लोकांचे धाबे दणाणले आहेत. गेल्या तिन दिवसामध्ये दारूबंदी पथकाची ही दुसरी मोठी कारवाई आहे.

